# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2017-18/प्र.वाढ/ ३०७०
दिनांक : 12 JAN 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव सादर करण्याबाबत...**

**संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : ॲप्रुव्हल/12(11)/2016.(लोकसत्ता दिनांक : 2.1.2017).**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ऍप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक 5.1.2017 ते दिनांक 4.2.2017 या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थामधील ज्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ऍप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मध्ये नमूद केल्याप्रमाणे **एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) कडून वैध** ऍक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने पदविका व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या अभ्यासक्रमांना **एनबीए (National Board of Accreditation, New Delhi)** कडून ऍक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 प्रमाणे पात्र अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. बाबत संस्थांनी परिषदेकडे सादर केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय/ शिफारस परिषदेस सादर करण्याकरीता, संबंधीत संस्थांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता लिंक स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर लिंकवर या संचालनालयामार्फत देण्यात आलेला सांकेतांक (संस्थेचा डिटीई कोड) व पासवर्ड व्दारे ऑनलाईन माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर भरल्यानंतर तात्काळ या संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरावी. या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्या करीता लिंक **दिनांक 4.2.2016 पर्यंत किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापर्यंतच** सुरु राहिल.

सह संचालक
दि. ...
आवक 784
दिनांक 21 JAN 2017

नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव सादर करतांना शैक्षणिक वर्ष 2017-18 साठीचा जिल्हानिहाय बृहत आराखडा विचारात घेण्यात यावा. सदर बृहत आराखडयाची प्रत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ज्या संस्थामार्फत संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने माहिती भरण्यात येईल अशा संस्थांनाच सुनावणीकरिता बोलाविण्यात येईल. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्देशांनुसार संस्थेमध्ये राबविण्यात येत असलेल्या पदविका अभ्यासक्रमांना एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) कडून वैध ऍक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 प्रमाणे पात्र अशा संस्थांनीच नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता या संचालनालयाच्या अभिप्रायांसह शासनामार्फत परिषदेस अभिप्राय/ शिफारस सादर करण्यात येईल. सुनावणी बाबतचे वेळापत्रक वेळोवेळी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच संबंधीत संस्थांनी, संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय

कार्यालयाकडे, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण 2013/प्र.क्र.43/तांशि-4, दि. 21.8.2013 मध्ये नमूद विहित शुल्क भरल्याची पावती, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचा ऑनलाईन अद्ययावत नो-डेफिशिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला,), परिषदेस सादर केलेल्या सहपत्रांसह अर्ज, संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले ॲनेक्चर "सी" व "डी" (प्रपत्र)(संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरल्यानंतर निर्माण होणारे ) व सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेला जागा/ बांधकाम/ इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ. बाबत सोबत जोडलेल्या ॲनक्चर "ई" (सोबत जोडल्याप्रमाणे) प्रपत्रातील माहिती, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची समसत्रातील ॲकेडमीक मॉनेटरींग रिपोर्टची प्रत व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावाच्या 2 प्रतींसह तसेच संबंधीत कागदपत्रांसह सुनावणीकरीता संस्थेतील जबाबदार व्यक्ती (प्राचार्य किंवा संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यापैकी एक अनिवार्य) यांनी संचालनालयामार्फत विहीत केलेल्या सुनावणीच्या दिनांकास उपस्थित राहणे आवश्यक राहील, याची नोंद संबंधीत संस्थांनी घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१ सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ...

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/२८८
दिनांक :- 23 JAN 2017

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सुरू असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव सादर करण्याबाबत संदर्भिय पत्रात दिलेल्या सुचना नुसार कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत :- १. संचालनालयाचे संदर्भिय पत्र.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.